RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!

## आजचा शुभ विचार

"नशिबावर विश्वास ठेवण्यापेक्षा स्वत:च्या ताकदीवर विश्वास ठेवा."आपण जे करतोय किंवा आपल्यात जी ताकद आहे ती ओळखायला शिका. नशिबावर निर्भर राहू नका.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर




मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-60 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Monday 07 July 2025 ▪ PAGES 6 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ६० ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ सोमवार, दि. ०७ जुलै २०२५ ▪ पाने ६ ▪ ₹ ४ रुपये

## ठाकरे बंधूंच्या युतीमुळे भाजपची झोप उडाली, नाशिकबाबत बघितलेलं स्वप्न भंगण्याची शक्यता

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------



गेल्या १८ वर्षांपासून एकमेकांपासून दुरावलेले ठाकरे बंधू हे काल मराठीच्या मुद्द्यावरुन एकत्र आले. ठाकरे बंधूंनी हीच युती आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये कायम ठेवली तर राज्यातील राजकीय समीकरणे पूर्णत: बदलू शकतात. पक्षफुटीनंतर गर्भगळीत झालेल्या उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला त्यामुळे नवी उभारी मिळू शकते. त्याचवेळी नाशिक महानगरपालिकेत 'शंभर प्लस' चे स्वप्न पाहणाऱ्या भाजपचे ते स्वप्न दोन्ही ठाकरे बंधूंच्या युतीमुळे भंगण्याची शक्यता व्यक्त केली जावू लागली आहे. नाशिक हा एकेकाळी मनसेचा बालेकिल्ला राहिला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला शहरात सध्या मोठी गळती लागली असली तरी काही प्रमाणात नाशिकमध्ये पक्षाचे संघटन अद्याप टिकून आहे. अशात हे दोन्ही पक्ष एकत्र आल्यास ताकद वाढणार असून भाजपच्या शंभरहुन अधिक नगरसेवक निवडून आणण्याच्या स्वप्नाला धक्का पोहचून आकड्यांचं गणित बिघडण्याची शक्यता आहे. नाशिकमध्ये शिवसेना व मनसे दोन्ही पक्षांचा प्रभाव राहिलेला असून सत्तेत राहिले आहेत. नाशिक महापालिकेत २०१२ पूर्वी शिवसेनेची सत्ता राहिली आहे. तर २०१२ ते २०१७ पर्यंत मनसेची सत्ता होती. नाशिकमध्ये शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या उपस्थिती झालेल्या अधिवेशनामुळेच राज्यात सर्वप्रथम शिवसेना सत्तेत आली होती. राज ठाकरे यांनाही नाशिककरांनी भरभरुन दिलं आहे. २०१२ मध्ये झालेल्या महानगरपालिकेच्या निवडणुकीत मनसेचे तब्बल ४० नगरसेवक नाशिकमध्ये निवडून आले होते. नाशिक महानगरपालिकेत मनसेला सत्ता मिळाली होती. परंतु २०१४ मध्ये देशभर भाजपची लाट आली. या लाटेचा प्रभाव राज्यात व नाशिकमध्येही पडला. २०१७ च्या निवडणुकीत भाजपने बाजी मारली व महापालिकेत सत्ता आणली. त्यानंतर आगामी कुंभमेळा नाशिकमध्ये होत असल्याने आता कोणत्याही परिस्थिती नाशिकमध्ये भाजपला सत्ता हवी आहे. त्यासाठीच भाजपने शंभर प्लस चा नारा नाशिकमध्ये दिला आहे. त्यासाठी पक्षात मोठे इनकमिंग सुरु आहे. शिवसेना(शिंदे) व भाजपने मिळून नाशिकमध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला पूर्ण पोखरलं आहे. पक्षाचे बडे बडे नेते आपल्या गळाला लावले आहे. गेल्या निवडणुकीत भाजपने ६६ जागा जिंकल्या होत्या. यावेळी शंभर प्लसचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी भाजपचा मोठा आटापिटा सुरु आहे. भाजपने दिलेला शंभर प्लसचा नारा म्हणजे एक प्रकारे मनपा निवडणुकीत स्वबळावर लढण्याचाच प्लॅन दर्शवतो. मात्र ठाकरे बंधू यांच्या युतीने भाजपची धडधड वाढली असून भाजपा आता स्वबळाचा त्याग करुन महायुती म्हणूनच निवडणूक लढण्याची शक्यता वाढली आहे.

## एक मेळावा, दोन ठाकरे अन् तीन प्रश्न! महाराष्ट्रातील जनतेला उत्तर कोण देणार?

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------------



राज ठाकरे व उद्धव ठाकरे एकत्र येण्याच्या चर्चा गेल्या चार महिन्यापासून सुरू होत्या. त्या चर्चेला दोन्ही भाऊ एकत्र आल्याने पूर्णविराम मिळाला आहे. तब्बल 20 वर्षांनी या मेळाव्याच्या निमित्ताने ठाकरे बंधू एकत्र आले. त्यामुळे कार्यकर्त्यांच्या उत्साहाला उधाण आले होते तर घोषणांनी वरळी डोमचा परिसर दुमदुमून गेला होता. 20 वर्षानंतर त्यांचे कार्यकते एकमेकांना भेटताना एक वेगळा आनंद दिसत होता. या मेळाव्याच्या निमित्ताने ठाकरे बंधू एकत्र असले असले तरी महाराष्ट्रातील जनतेला पडलेल्या तीन प्रश्नाचे उत्तर कोण देणार? असा प्रश्न पडला आहे.

राज्यात लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होत आहेत. त्यामुळे येत्या काळात होत असलेल्या निवडणुकीच्या अनुषंगाने सर्वच पक्षाकडून तयारी केली जात आहे. ठाकरे बंधूनी आगामी काळात होत असलेल्या मुंबई महापालिकेच्या निवडणूका डोळ्यासमोर ठेवून पावले उचलली आहेत. त्यामुळे येत्या काळात त्याचा कितपत परिणाम होणार याची उत्सुकता सर्वानाच लागली आहे. राज व उद्धव ठाकरे एकत्र आले असले तरी जनतेला काही प्रश्न सतावत आहेत.

आगामी कळत होत असलेल्या मुंबई महापलिका निवडणुकीत उद्धव ठाकरेंची शिवसेना व मनसे युती करणार का ? याची उत्सुकता लागली असली तरी या मेळाव्यातून स्पष्टता येत नाही. त्यामुळे ठाकरे बंधू एकत्र येणार का यावर उद्धव ठाकरेंनी सकारात्मकता दाखवली असले तरी राज यांनी सस्पेन्स कायम ठेवला आहे. या मेळाव्यात महापालिका एकत्र लढवण्याची घोषणा होईल असे वाटत होते. मात्र, तसे झाले नाही. त्यामुळे येत्या काळात ठाकरे बंधू काय भूमिका घेणार ? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

येत्या काळात ठाकरे बंधू एकत्र येणार असले तरी उद्धव ठाकरे यांनी महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याबाबत काहीच वक्तव्य केले नाहीत. दुसारीकडे वरळीत पार पडलेल्या विजयी मेळाव्याला काँग्रेसच्या नेत्याने दांडी मारली. पवारांच्या राष्ट्रवादीकडून सुप्रिया सुळे आणि जितेंद्र आव्हाड उपस्थित होते. दुसऱ्याा पक्षांचे नेते मेळाव्याला उपस्थित होते, त्यांचा व्यासपीठावर बोलवून सन्मान करण्यात आला. त्यामुळे आगामी काळात होत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीचे काय होणार? उद्धव ठाकरे आघाडीतून बाहेर पडून मनसेसोबत युती करणार का असा प्रश्न विचारला जात आहे.

विजयी मेळाव्यातून जोरदार भाषण करताना राज ठाकरेंनी विरोधकांची पिसे काढली. मेळाव्याच्या निमित्ताने दोन्ही भाऊ एकत्र आले असले तरी युतीबाबतची घोषणा त्यांनी केली नाही. यावेळी राज ठाकरेंनी बाळासाहेबांना जे जमले नाही ते फडणवीसांना जमले असे म्हणत टोलेबाजी केली. दुसरीकडे त्यांनी एकनाथ शिंदेंवर टीका केली नाही. तर एकनाथ शिंदेंनीही राज ठाकरेंवर टीका केली नाही, उद्धव ठाकरेंचा समाचार घेतला. त्यामुळे येत्या काळात राज ठाकरे हे शिंदे, फडणवीसांची साथ सोडणार का? असा सवाल विचारला जात आहे.

## मांडवड विद्यालयात विठू नामाचा गजर

सोमनाथ घोगांणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

------------------------



म.वि.प्र. संचलित स्व. शरद आण्णा आहेर जनता विद्यालय, मांडवड विद्यालयात "आषाढी एकादशी" निमित्ताने दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाची सुरुवात विठुरायाच्या प्रतिमा पूजन व आरतीने करण्यात आली.उपस्थितांचे स्वागत करत विद्यालयाचे मुख्याध्यापक थेटे एस.जी. यांनी महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये संतांचे योगदान, आषाढी एकादशी निमित्ताने वारकरी संप्रदाय पंढरपूरला जात असताना विठुराया प्रति असलेली त्याची श्रद्धा, महाराष्ट्राची संस्कृती, विठुराया प्रति समर्पण भावना, शिस्तबद्ध दिंड्या याविषयी अभ्यासपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना दिली.

त्यानंतर विठ्ठल_रुक्मिणी ची मूर्ती, ज्ञानेश्वरी ठेवलेली पालखी घेऊन विठ्ठलाच्या वेशभूषा मध्ये असलेली विद्यार्थिनी सिद्धी थेटे व रुक्मिणी वेशभूषा मध्ये असलेली शितल जाधव, यांच्या समवेत वारकरी वेशभूषा मध्ये आलेले विद्यार्थी गळयात तुळशीच्या माळा व कपाळावर अष्टगंध, पायजमा, डोक्यावर टोपी परिधान करून व हातामध्ये भागवत धर्माच्या ध्वज पताका घेऊन तर विद्यार्थिनी नऊवारी साडी परिधान करून व डोक्यावर तुळस घेऊन दिंडीमध्ये सहभागी झाले होते. गावातील मंडपेश्वर मंदिर येथे मृदुंगाच्या गजरात व विठ्ठल विठ्ठल जय हरी,ज्ञानोबा माऊली तुकारामाचा गजर करत दिंडी नेण्यात आली. या ठिकाणी विद्यार्थ्यांनी अभंग, भजन सादर करत भक्तिमय वातावरण निर्माण केले. सदर कार्यक्रमासाठी शालेय स्कूल कमिटी अध्यक्ष प्रशांत भाऊ आहेर,मांडवड गावाचे तंटामुक्ती अध्यक्ष चंद्रसेन आबा आहेर, मविप्र सभासद बाबुराव तात्या आहेर, बाळासाहेब आहेर, गंगाराम थेटे, गंगाधर आहेर, रामराव भाऊ मोहिते, दौलतराव आहेर, गावातील प्रतिष्ठित व्यक्ती डॉ.प्रवीण निकम, मांडवड सोसायटी मा.चेअरमन योगेश आहेर व शंकर मोहिते उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाला मविप्र नांदगाव तालुका संचालक इंजि. अमित भाऊ बोरसे(पाटील) यांनी शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाचे नियोजन क्रीडाशिक्षक संदीप आहेर, ज्येष्ठ शिक्षक कवडे एस. एस., परदेशी एच. टी., सांस्कृतिक विभाग प्रमुख चव्हाण एम. के. यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारीयांनी परिश्रम घेतले व भक्तीपूर्ण वातावरणात कार्यक्रम यशस्वी पार पडला.

## राज्यावरील संकटे दूर कर, मुख्यमंत्र्यांचे विठुला चरणी साकडे; महापूजेचा मान नाशिक जिल्ह्यातील उगले वारकरी दाम्पत्याला

राजेंद्र यादव
सोलापूर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------



आषाढी शुद्ध एकादशी निमित्त श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा मुख्यमंत्री देवेंद फडणवीस यांनी सपत्नीक वारकरी दाम्पत्य कैलास उगले, कल्पना उगले यांच्या समवेश महापूजा केली. पांडुरंगाने राज्यावरची संकटे दूर करण्याची शक्ती द्यावी, सन्मार्गाने चालण्याची सुबुद्धी द्यावी, बळीराजाला सुखी समाधानी करण्याकरिता आशीर्वाद द्यावा, असे साकडे मुख्यमंत्री फडणवीस यांनी विठुरायाला घातले.

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने मुख्यत्र्यांचा सत्कार करण्यात आला . मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, वारीची परंपरा सातत्याने वाढत आहे आणि यावर्षी तर वारीने एक नवीन विक्रम केलेला आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात वारकरी या वारीमध्ये चालत पांडुरंगाच्या दर्शनाकरीता या ठिकाणी आले. ज्या दिंड्या आहेत त्या सोबत तर वारकरी आलेच परंतु पायी चालत ही मोठ्या प्रमाणात वारकरी आले. विशेषत: या वारकऱ्यांमध्ये तरुणांची संख्या मोठी आहे. शासन व प्रशासनाने वारकऱ्यांना चांगल्या सुविधा दिल्या आहेत. पालकमंत्री गोरे यांच्या नेतृत्वात प्रशासनाने चांगले जर्मन हँगर तयार केल्याने वारकऱ्यांसाठी चांगली व्यवस्था झाली, असे त्यांनी सांगितले.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने पांडुरंगाची पूजा करायला मिळणे हा सर्वांच्या जीवनातला आनंदाचा क्षण आहे. दिंड्या सोबत अनेक वारकरी स्वयंप्रेरणेने पायी चालत आले. वारीत प्रत्येक व्यक्ती इतरांमध्ये पांडुरंग पाहतो, ही प्रथा जगाच्या पाठीवर कुठेही नाही. वारीत हरीनाम गजर करतांना नवी ऊर्जा मिळते. वारीने खऱ्या अर्थाने भागवत धर्माची पताका उंचावत ठेवली आहे. ही आपली संस्कृती अलौकिक आहे असे सांगून मानाच्या वारकऱ्यांना पांडुरंगाचा आशीर्वाद मिळत राहो, अशी सदिच्छा फडणवीस यांनी व्यक्त केली.

निर्मल वारीच्या माध्यमातून अतिशय चांगला आवश्यक व्यवस्था उपलब्ध केल्याने कुठेही अस्वच्छता पाहायला मिळाली नाही आणि निर्मल वारी सोबत हरित, पर्यावरण पूरक वारीदेखील झाली. खऱ्या अर्थाने आपल्या संतांनी जो स्वच्छतेचा संदेश दिलेला आहे तो या वारीमध्ये प्रत्यक्ष अनुभवायला मिळाला. राज्याच्या गतीमध्ये अध्यात्मिक प्रगती महत्त्वाची असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पालकमंत्र्यांनी आणि जिल्हा प्रशासनाने व्हीआयपी दर्शन बंद करण्याचा निर्णयाचे स्वागत केले. ते म्हणाले, या निर्णयामुळे सर्वसामान्य भाविकांचा श्री विठ्ठल दर्शनाचा कालावधी पाच तासाने कमी झाला. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी प्रस्तावित केले.

शासकीय महापूजेचे मानाचे वारकरी कैलास उगलले आणि कल्पना उगले हे नाशिक जिल्ह्यातील नांदगाव तालुक्यातील जातेगाव येथील आहेत. उगले वारकरी दाम्पत्याचा मुख्यमंत्र्यांच्यासमवेत महापूजेचा मान मिळाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व त्यांच्या पत्नी अमृता फडवणीस यांच्या हस्ते महापुजेनंतर उगले दाम्पत्याचा सन्मान करण्यात आला. तसेच एसटी महामंडळाकडून त्यांना मोफत वर्षभर एसटी पास मुख्यमंत्र्यांच्या हस्ते वितरित करण्यात आला.

## पंढरपुरातील मानाचा वारकरी ठरलेल्या नाशिकच्या उगले दाम्पत्याला मिळाला वर्षभर एसटीचा मोफत पास

किशोर सोनवणे
दैनिक स्वराज्यदूत

------------------------



आषाढी एकादशीच्या शासकीय महापूजेच्या वेळी उपस्थित राहण्याचा मान मिळालेल्या कैलास दामू उगले या मानाच्या वारकरी ठरलेल्या उगलेंचा आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला, यावेळी उगले दाम्पत्याला वर्षभर एसटीचा मोफत पास देवून त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला, आज पहाटे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सपत्नीक विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा संपन्न झाली, त्यानंतर मंदिरात झालेल्या कार्यक्रमात कैलास दामू उगले यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला, यावेळी मंदिर समितीच्या वतीने व्यसन मुक्ती, पर्यावरण संवर्धन समाज जागृतीचे काम करणाऱ्या दिंड्यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले, यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर आदी उपस्थित होते.

सम्पादकीय

# मराठी-हिंदीच्या वादात भाजप, ठाकरे बंधूचं गणित साधलं; तरंगत्या भुमिकेने शिंदेंची मात्र कोंडी

हिंदी भाषा सक्तीच्या मुद्दयावरून गेले काही दिवस रान पेटले होते. ठाकरे बंधू एकवटल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिंदी सक्तीच्या मुद्द्यावरून काढलेले दोन्ही जीआर रद्द करण्यात अचानक 360 अंशात माघार घेतली. या सर्व राजकीय वादाचे परिणाम आगामी काळात होत असलेल्या मुंबई महापालिका निवडणुकावर होणार आहेत.

गेल्या काही दिवसापासून मराठीच्या मुद्दयामुळे विखुरलेला मराठी माणूस राज व उद्धव ठाकरे बंधूंच्या बाजूने उभा राहणार आहे. तर दुसरीकडे भाजपने हिंदी भाषिकाची बाजू लावून धरत त्यांच्या मतांची बेगमी केली आहे. दुसरीकडे या राजकीय वादात धरसोड वृत्तीमुळे शिंदेंच्या शिवसेना बॅकफूटला दिसत आहे.

राज्य सरकारने राज्यात पहिलीपासून हिंदी भाषा शिकवण्याबाबतचा निर्णय घेतला होता. हा निर्णय राज्य सरकारचा असला तरी शिवसेना शिंदे गटाचे मंत्री असलेल्या दादा भुसे यांच्या शालेय शिक्षण विभागाने त्याबाबतचा अध्यादेश काढला होता. त्यावरून वाद सुरू होताच भाजपने हिंदी शिकवणे कसे योग्य आहे, याबाबत जोरकसपणे बाजू मांडली. त्याच ताकदीने त्याला शिवसेना ठाकरे गट आणि मनसेने विरोध करीत राजकीय मतभेद विसरून संयुक्त मोर्चा काढण्याचा इशारा दिला होता. शिवसेना आणि मराठी हे अतूट नाते असतानाही एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने सुरुवातीला कोणतीच भूमिका घेतली नाही. त्यानंतर मंत्रिमंडळ बैठकीत त्यांनी हिंदीबाबतच्या निर्णयाला विरोध करीत हा निर्णय मागे घेण्यास भाग पाडले खरे, पण त्या सर्व बाबी सामान्यांपर्यंत पोहोचली नाही. या निर्णयाबद्दल शिवसेनेतील अनेक नेते नाराज होते, मात्र कुणीही जाहीरपणे नाराजी बोलून दाखवली नाही. भरीस भर म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेसचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीदेखील शेवटच्या टप्प्यात या निर्णयाला विरोध केला. त्यामुळे एकनाथ शिंदे यांच्या पक्षाची खूप अडचण झाली. येत्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होणार आहेत. त्याची तयारी सर्वच पक्षाने सुरु केली आहे. हिंदी सक्तीच्या मुद्दयावरून भाजपने हिंदीची बाजू लावून धरीत हिंदी भाषिक मतांची बेगमी साधली आहे. तर मनसे आणि शिवसेना ठाकरे गटानेही हिंदीसक्तीला टोकाचा विरोध करीत काहीसा विखुरलेला मराठी माणूस जवळ करण्याचा प्रयत्न केला आहे. दरम्यान, शिवसेना शिंदे गटाने सुरुवातीला ठोस भूमिकाच घेतली नाही. त्याचा त्यांना राजकीय आखाड्यात फटका बसेल, असा अंदाज लावला जात आहे. मराठी-हिंदी भाषेच्या राजकीय वादात शिवसेना शिंदे गट सर्वाधिक अस्वस्थ असल्याचे दिसत आहे. या प्रकरणात सुरुवातीला शिंदे गट काहीसा शांत दिसत होता. दरम्यान, राजकीयदृष्ट्या नुकसान होऊ शकते याचा अंदाज आल्यानेच त्यांच्या मंत्र्यांनी कॅबिनेटमध्ये हिंदीच्या सक्तीविरोधात भूमिका घेतली. दरम्यान, शिंदेंना राजकीयदृष्ट्या भविष्यात किती नुकसान होऊ शकेल, हे ठाकरेंच्या विजयी मेळाव्याला कसा प्रतिसाद मिळतो, त्यावर अवलंबून असेल, असे राजकीय विश्लेषक हेमंत देसाई म्हणाले.

राज्य सरकारच्या हिंदीसक्तीच्या निर्णयामुळे विस्कळित झालेला मराठी माणूस एक झाला आहे. भाजपाभोवतीही हिंदी भाषिक आकर्षित होतील. मात्र शिवसेना शिंदे गटाने विशेष ठोस भूमिका घेतली नसल्याने त्याची किमती त्यांना मोजावी लागू शकते, असे राजकीय विश्लेषक राजू परुळेकर यांनी स्पष्ट केले. हिंदी भाषा सक्तीच्या मुद्दयावरून वाद निर्माण करीत भाजपने मुंबई महापालिका निवडणुका डोळ्यासमोर ठेवून हिंदी भाषिक मतांची बेगमी केली. मराठीच्या मुद्दयामुळे विखुरलेला मराठी माणूसही ठाकरे बंधूंच्या बाजूने उभा राहत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे या सर्व घडामोडींमध्ये शिवसेना शिंदे गटालाच नुकसान होऊ शकेल, असे दिसत आहे, असे राजकीय विश्लेषक जयंत माईनकर म्हणाले. राजकीय आखाड्यात कोणी काही म्हटले तरी एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असतानाच मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून दिला. मराठी चळवळ मजबूत व्हावी, यासाठी ग्रंथालयांना अनुदान दिले. मराठी माणूस मुंबईत राहावा म्हणून शिवसेना प्रयत्न करीत आहे. तसेच मराठीबाबत कोणतीही तडजोड नसल्याचे सुरुवातीलच स्पष्ट केले आहे. हिंदी भाषेचा अध्यादेश मागे घेण्यासाठी शिवसेनेनेच भाग पाडले, असे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे प्रवक्ते किरण सोनवणे यांनी सांगितले.

# आदर्शांची पोकळ प्रतिमा आणि व्यसनाचा प्रसार

## सेलिब्रिटींच्या व्यसन जाहिराती : तरुणांच्या भविष्याला धोका - हिम्मत बोरसे नंदुरबार (वैंदाणे)



लहान मुलांवर लहानपणापासूनच कुटुंबातून आणि शाळेतून संस्कार घडत असतात परंतु संगत आणि मित्रपरिवार जर अयोग्य असला तर कुटुंबातून आणि शाळेतून मिळालेल्या संस्कारावर काहीसे विरजण पडते आणि नको ती घटना आपल्या पाल्यांबाबत पालकांच्या कानावर पडते. मुलगा व्यसनाच्या आहारी जातो.त्यातून बाहेर निघण्याचा तो थोडाही प्रयत्न करीत नाही किंबहुना मित्रपरिवार देखील मज्जाव करीत नाही. मग सुसंस्कारी मुलगा "व्यसनाधीन" कधी बनतो याची पुरसटशीही कल्पना कुटुंबाला होत नाही. याचा अर्थ त्याच्या कुटुंबाने मुलांवर वचक ठेवला नाही असे बिल्कुल नाही. चांगल्या आणि वाईट गोष्टी कोणत्या व त्यापासून होणारे दुष्परिणाम काय होतात याची कल्पना मुलांना शालेय जीवनातूनच दिली जाते. याशिवाय कुटुंबातून देखील मुक्त चर्चा अशा विषयांवर होते. मग तरीही मूलं व्यसनाधीन बनले असे शब्द समाजातून चौफेर बाजूने पालकांच्या कानावर ऐकू येतात. परंतु याला नेमका जबाबदार घटक कोणता असा प्रश्न पडल्यास त्याचे उत्तर म्हणजे भ्रष्ट व्यवस्थेतून जीवनमान अधिक रंजक बनविणाऱ्या अनावश्यक जाहिराती होय.लाखो कुटुंबातील निर्व्यसनी लोकांना व्यसनी बनविण्याचे महापाप याच आदर्श समजल्या जाणाऱ्या महापराक्रमी व्यक्तींकडून अप्रत्यक्षपणे केले जात आहे.

भारत हा तरुणांचा देश आहे, याच तरुणांच्या शक्तीच्या जोरावर जागतिक महासत्ता बनण्याची आशा आहे. स्वामी विवेकानंदांच्या विचारांच्या तरुण देशाला अपेक्षित आहे "या जीवन आपले सार्थ करा रे, राष्ट्रभक्ती निस्वार्थ करा रे, कार्य करा या देशाच्या प्रगतीचे. या ओळी प्रमाणे राष्ट्रभक्ती जपणारा, प्रगतीचे कार्य करणारा आणि आरोग्य आपली धनसंपदा समजून आरोग्य जपणारा तरुण अपेक्षित असताना ,तरुणांना व्यसनाच्या विळख्यात ओढण्याचे काम सर्रासपणे सुरू असल्याचे आपण पाहत आहोत

महापुरुषांना आदर्श मानणाऱ्यान पेक्षा, क्रिकेटर अभिनेते यांना आदर्श मानणारे यांचा वर्ग मोठा आहे. यामुळे सेलिब्रिटींची जबाबदारी अधिक वाढते परंतु याच सेलिब्रिटींनी सध्या व्यसनाला खत पाणी घालणाऱ्याआहेत जाहिरातींचा धमाका लावला आहे.

बोलो जुबा केसरी, दाने दाने मे केसर का दम, रमी सर्कल, ड्रीम ११

यासारख्या जाहिरातींनी तर आयपीएल सुरू असताना कहरच केला , यासारख्या जाहिराती नकळत तरुणांना वाम मार्गाकडे घेऊन जात आहेत हे लक्षात घेतले पाहिजे. कर्करोगाचे करूनीया व्यसन, काढील जो धूर, बुडेल ते घर त्याने पापे

या उक्तीप्रमाणे ऑनलाइन जुगारामुळे कित्येक लोकांनी आत्महत्या केल्या तर कित्येक व्यक्ती बर्बाद झाले आहेत, कर्करोगाचे रुग्ण दिवसेंदिवस वाढत आहेत, व्यसनामुळे कर्ता पुरुष गेल्यावर कुटुंबाची होणारी वाताहत न बघवणारी असते .पत्नी, मुले उघड्यावर पडतात ही साधी गोष्ट लक्षात येऊ नये ही आश्चर्याची बाब म्हणता येईल .इतके असंवेदनशील होता कामा नये.

पैसे महत्त्वाचे नसून लोकांना जाणारा संदेश चुकीचा आहे असे म्हणत गुटख्याची किंवा तत्सम वस्तूंची जाहिरात नाकारणारे महान व्यक्ती याच क्षेत्रातून येतात. याचा आदर्श इतर कधी घेणार आहेत?

शाळा महाविद्यालय यासारख्या ज्ञान मंदिरात पर्यंत या व्यसनाचे लोन पसरले आहे नेमके आपण काय साध्य करू पाहत आहोत? हे एकदा या जाहिरात करणाऱ्यांनी पडताळून पाहिले पाहिजे. आपल्यामुळे कुणाचे परिवार उध्वस्त होता कामा नये एवढी दक्षता घेतली पाहिजे.पैसे कमवायचे इतर माध्यम आहेत पण व्यसन करायला भाग पडेल इतक्या रंजक जाहिराती करता कामा नये एवढीच माफक अपेक्षा या जाहिराती करणाऱ्या सेलिब्रेटिंकडून आहेत.

---------------------------

संकलन
संजय बच्छाव

# सुहास कांदेंना धक्का, पक्षाने समीर भुजबळांचा राजीनामा नाकारला

शैलेश रौंदळ
नाशिक प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------



विधानसभा निवडणुकीवेळी नांदगाव विधानसभा मतदारसंघाची जागा महायुतीत शिवसेना(शिंदे गट)च्या वाट्याला गेली होती. त्यामुळे तिथे शिवसेनेचे आमदार सुहास कांदे यांना महायुतीची उमेदवारी मिळाली. मात्र समीर भुजबळ यांनी महायुतीचा धर्म मोडू नये म्हणून राष्ट्रवादी पक्षाच्या सदस्यत्वाचा व मुंबई शहराध्यक्ष पदाचा राजीनामा देऊन सुहास कांदे यांच्या विरोधात अपक्ष उमेदवारी केली होती. निवडणुकीत समीर भुजबळ यांचा पराभव झाला. मात्र त्यानंतरही मुंबईत पार पडलेल्या पक्षाच्या काही कार्यक्रमांना समीर भुजबळ हजर होते. त्यामुळे नक्की पक्षाने समीर भुजबळांचा राजीनामा स्विकारला आहे किंवा नाही याबाबत संभ्रम होता. पक्षाचे प्रमुख अजित पवार यांनीही अधिकृतपणे भुजबळ यांच्या राजीनाम्याबाबत भूमिका स्पष्ट केलेली नव्हती. त्यामुळे समीर भुजबळांचा राजीनामा राजकीय स्टंट असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती.

# विठ्ठलाचा नामाचा जयघोष करत भर पावसात चिमुकल्या विद्यार्थ्यांनी काढली दिंडी;

सुनील म्हसदे
बागलाण तालुका प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------

"उत्तम शिक्षण, उत्तम संस्कार" या संस्थेच्या ब्रीदवाक्यप्रमाणे शहरातील दोधेश्वर पब्लिक स्कुलमध्ये सर्व सण उत्सव साजरा करून त्यांची महती आजच्या पिढीपर्यंत पोहचविण्याचे काम गेल्या अनेक वर्षांपासून चालु आहे. आषाढी एकादशी महाराष्ट्रासह देशभरात मोठ्या उत्साहाने साजरा केली जाते. त्याअनुषंगाने विद्यार्थी आणि शिक्षकांनी आज आषाढी एकादशी निमित्ताने विविध कार्यक्रम आयोजित केले होते.

सुरुवातीला संस्थेच्या सचिव श्रीमती मनोहरम्मा सुलू यांनी विठ्ठल रुख्मिणी यांच्या प्रतिमेची तसेच प्रि- प्रायमारीच्या विठ्ठल रुख्मिणी यांच्या वेषात आलेल्या विद्यार्थ्यांची मनोभावे पूजा केली. यानंतर शाळेच्या शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली शाळे जवळच्या परिसरात दिंडीचे आयोजन करण्यात आले. भर पावसात विद्यार्थी, विद्यार्थ्यांनी, शिक्षक, शिक्षीका यांनी पांडुरंगाचे नामस्मरण करत विठ्ठल रुक्मिणी सह वारकऱ्यांच्या वेशभूषेतील बालगोपाल टाळ, वाद्य आणि विठ्ठल गीतांच्या











सुमधुर संगीताच्या वातावरणात संपूर्ण परिसर भक्तिमय करून टाकला.

परिसरातील जाधव परिवाराने यावेळी विठ्ठल रुक्मिणी यांची मनोभावे पूजा करून सर्व विद्यार्थ्यांना लाडूचा



प्रसाद दिला. वैशाली पगार, अर्चना पाटील, रोशनी पाटील, नेहा बागुल, माहेश्वरी कापडणीस यांसह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

# माध्यमिक विद्यालय सिडको वसाहत विद्यालयात आषाडी एकादशी निमित्त वृक्ष दिंडीचे आयोजन

## पारंपारिक वारकरी वेशभूषा करून परिसरातील नागरिकांना वृक्ष संवर्धनाचा दिला संदेश

संतोष मोहिते
विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------











नाशिक शहरातील सिडको परिसरात असलेल्या अंबिका मित्र मंडळ संचलित माध्यमिक विद्यालय सिडको वसाहत विद्यालयात दिनांक शनिवार ०५/०७/२०२५ रोजी माध्यमिक विद्यालय आषाढी एकादशी निमित्त वृक्षदिंडी काढून वृक्षसंवर्धना करिता जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. बाळासाहेब पाटील,सचिव संदिप पाटील, अनाम शिक्षण प्रसार मंडळाच्या अध्यक्षा डॉ.ऋतिक पाटील, सचिव श्री.नानासाहेब पाटील, संस्थेच्या उपाध्यक्षा. श्रीमती . निता पाटील मॅडम शाळेच्या मुख्याध्यापक.श्री.सतिश भालेराव उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.केशव जगताप यांनी केले. कार्यक्रमास श्री. भटू पाटील, श्रीमती. वैशाली खैरनार, श्री. तुषार तुपे, श्री.रमेश अंभोरे, भाऊ यांनी मोलाचे सहकार्य केले.

# जे टी.कासलीवाल स्कूलमध्ये आषाढी एकादशीनिमित्त दिंडी उत्सव उत्साहात संपन्न

सोमनाथ घोगांणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------




नांदगाव येथील जे. टि. कासलीवाल इंग्लिश मिडीयम स्कूल मध्ये आषाढी एकादशीच्या निमित्ताने दिंडी उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी वारकरी वेशभूषा केली होती. विठूमाऊलीच्या अभंगावर ठेकाधरत बाल वारक-यांनी दिंडी उत्सवात साजरी केली. स्कूलचे प्राचार्य श्री.मणी चावला यांच्या हस्ते विठ्ठल रुक्मिणीच्या प्रतिमा पुजनाने व आरतीने कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. विठ्ठल रुक्मिणीच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांचा उत्साह अवर्णनीय होता.या निमित्ताने वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी ढोल ताशांच्या गजरात तसेच 'ज्ञानोबा माऊलीचा' गजर करत दिंडी नांदगाव येथील संत सावता महाराज कंम्पाऊड या ठिकाणी संत सावता महाराज व विठ्ठल रुक्मिणी मंदिरात नेण्यात आली. तेथील विश्वस्त प्रशांत खैरनार यांनी विद्यार्थ्यांना आषाढी एकादशीचे महत्त्व समजाविले. व विश्वस्तांनी विद्यार्थ्यांना प्रसाद वाटप केला. तेथे बाल वारक-यानी समूह नृत्य, लेझीम नृत्य,गोल रिंगण, वारकरी पाऊली तसेच विद्यार्थ्यांनी 'माऊली माऊली' चा गजर करत,विठ्ठल नामाची शाळा भरवली, पंढरी पंढरी अभंग गात ,पाऊली खेळत आपला उत्साह द्विगुणीत केला.यावेळी स्कूलचे प्राचार्य श्री मणी चावला सर उपस्थित होते.या कार्यक्रमाचे नियोजन सांस्कृतिक कार्यक्रमाच्या प्रमुख सौ.सुवर्णा आव्हाड यांच्या अध्यक्षतेखाली सर्व शिक्षकांनी मिळून केले .

# ताहाराबाद विद्यालयात आषाढी एकादशी निमित्त भव्य दिंडी सोहळा

सुनील म्हसदे
बागलाण तालुका प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------










ताहाराबाद येथील मविप्र संस्था संचलित न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनियर कॉलेज, ताहाराबाद विद्यालयात आषाढी एकादशी निमित्त भव्य दिंडी सोहळा आयोजित करण्यात आला.सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ज्युनिअर कॉलेज शालेय समितीचे अध्यक्ष विलास बापू निकम यांनी भूषविले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला शालेय समिती अध्यक्ष विलासबापू निकम, प्राचार्य दिपक डावरे, उपमुख्याध्यापिका आर.आर सोनवणे, उपप्राचार्य सुनील देशमुख,केदा निकम यांच्या हस्ते विठू माऊलीच्या तसेच रुक्मिणी मातेच्या प्रतिमेचे आरतीसह पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेत उपशिक्षक के.जी अहिरे यांनी आषाढी एकादशी व वारकरी पंथाचे महत्त्व उपस्थितांना सांगितले. त्यानंतर ताहाराबाद गावातील हरी ओम सत्संग मित्र मंडळातील कीर्तनकारांचे मंत्रमुग्ध करणारे कीर्तन शालेय आवारात पार पडले. कीर्तनात सर्व शिक्षक व विद्यार्थी विठ्ठलाच्या भक्तीत रंगून गेले होते. जणू काही शाळेत विठ्ठल नामाची शाळाच भरली होती असे भक्तीमय वातावरण शाळेत निर्माण झाले होते. त्यानंतर विद्यालयातर्फे पालखीतून विठ्ठल व रुक्मिणीच्या प्रतिमेसह गावातून भव्य दिंडी काढण्यात आली. सदर दिंडीत टाळ व मृदुंगासह सर्व विद्यार्थी, वारकरी व शिक्षक विठ्ठल नामाचा गजर करत सहभागी झाले. गावात ठिकठिकाणी गावकऱ्यांच्या वतीने विठू माऊलीच्या पालखीचे पूजन करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपशिक्षक जितेंद्र बच्छाव यांनी तसेच आभार उपशिक्षक सुजित देवरे यांनी मानले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जुनिअर कॉलेजचे व्ही. डी. जाधव, अनिल ठाकरे, ए. डी. गोसावी, किरण देवरे,अभिजित गोसावी, के. एन, भडांगे, दौलत चौधरी तसेच माध्यमिक विभागाचे उपशिक्षक एस. के. निकम,जे. एल. गावित,के.जी.अहिरे, के. एम. मोरे, के. ए.बागुल, एस.बी.सोनवणे, श्रीमती पी.पी. माटे, जे.पी. बच्छाव, के.बी. चव्हाण, आर. जी.संसारे, श्रीमती एस. बी.रौंदळ, एस.आर. दळवी, के. एम. पवार,श्रीमती डी.आर. गावित, एस.जी. गिरी, एस. ए. पवार, एस. यू. भामरे, एस.पी.देवरे, आर. डी. पगार, श्रीमती एस.व्ही. सूर्यवंशी, डी. एल. कापडणीस, जयदीप मोरे, डी.व्ही. सोनवणे, एल.यु.साळवे, वाय. व्ही. पवार तसेच सुनील देवरे, सखाराम अहिरे, निलेश माळी, कुणाल देवरे, धनंजय वणीस,मंगेश पगारे, प्रवीण रौदळ मामा आदिनी प्रयत्न केले.

# बुब मेमोरियल ट्रस्ट व अराईज संस्थेकडून टाकळी शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

संतोष मोहिते
विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------




अखिल भारतीय स्तरावर शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात सेवाव्रत जपणा-या श्री व श्रीमती रामनारायणजी बुब मेमोरियल ट्रस्ट व अराईज फाउंडेशन पुणे यांच्याकडून टाकळी जिल्हा परिषद शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाची वाॅटर प्रुफ स्कुल बॅग, चार वह्या, ड्राॅईंग बुक, वाॅटर बाॅटल व ज्ञानरचनावादावर आधारित स्वाध्याय पुस्तिकांचे वाटप करण्यात आले. या साहित्य वाटप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे बाळासाहेब फोडसे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून स्थापत्य अभियंता श्रीकांत नवले उपस्थित होते. याशिवाय पोपटराव शेवाळे, नाना गायकवाड, दत्ताराम दातखिळे, विनायक गाडे, दादा पाटील तिकांडे, जनार्दन गायकवाड, विजय मदगे, श्रीमती रोहिणी पवार, सुनंदा तिकांडे, अलका गांगड, कमल चासकर तसेच मोठ्या संख्येने टाकळी गावातील शिक्षणप्रेमी ग्रामस्थ व प्रतिष्ठित मान्यवर कार्यक्रमास उपस्थित होते. या आनंदमयी कार्यक्रमाला देवठाण बीटाचे शिक्षण विस्तार अधिकारी अनिल गायकवाड यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांना स्कुल किटचे वाटप केले. टाकळी शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविणाऱ्या स्वयंसेवी संस्थांच्या स्तुत्य उपक्रमाचे अकोले तालुका गटशिक्षणाधिकारी अरविंद कुमावत यांनी अभिनंदन व कौतुक केले. आपुलकीच्या मिशन अंतर्गत शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला टाकळी शाळेतील विद्यार्थ्यांना अनमोल भेट मिळाल्याबद्दल केंद्रप्रमुख रोहिणी खतोडे यांनी शाळेचे मुख्याध्यापक डॉ.श्रीनिवास पोतदार, सहशिक्षिक संजय देशमुख, दत्तात्रय देवगिरे वसंजय शिंदे यांचे अभिनंदन केले.

# डॉ. शालिनीताई बोरसे माध्यमिक विद्यालयात आषाडी एकादशी निमित्त पर्यावरण पूरक दिंडी

## वृक्षसंवर्धन / पर्यावरण सप्ताह निमित्त इको क्लब फॉर मिशन / वृक्षारोपण

संतोष मोहिते
विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

---------------------







अंबिका मित्र मंडळ संचलित डॉ. शालिनीताई बोरसे माध्यमिक विद्यालयात शनिवार दिनांक ०५/०७/२०२५ रोजी विद्यालयात वृक्षसंवर्धन / पर्यावरण सप्ताह निमित्त इको क्लब फॉर मिशन / वृक्षारोपण करण्यात आले. विद्यालयात आलेल्या सर्व मान्यवरांनी, शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण केले. आषाढी एकादशीनिमित्त वृक्षदिंडी काढून वृक्षसंवर्धना करिता जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष माननीय श्री. बाळासाहेब पाटील, सचिव संदिप पाटील, संस्थेच्या सदस्या सौ. प्रिया पाटील मॅडम संस्थेचे प्रशासन अधिकारी श्री.राजेंद्र सोनवणे, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. देवकर कविता मॅडम उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिवे प्रतिभा मॅडम यांनी केले. कार्यक्रमास मोरे कुमुद , देसले एल. पी . मनीषा पाटील , ज्योती गुजर, चांदनी पगारे, प्रीती अस्वार, लोखंडे मॅडम , सुनील पाटील, भाऊसाहेब भामरे यांनी मोलाचे सहकार्य केले.

# कुऱ्हाडी बस स्टॉपजवळ ऑटो चालकांचा अतिक्रमनवाद अपघाताचा धोका गडद, ग्रामपंचायत सदस्यांचा प्रशासनाला इशारा

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

---------------------------








गोरेगाव– बोदलकसा– तिरोडा मार्गावरील कुऱ्हाडी बस स्टॉप परिसर सध्या ऑटोचालकांच्या बिनधास्त अतिक्रमणामुळे धोकादायक बनला असून, सामान्य प्रवासी, शालेय विद्यार्थी व रुग्णालयात जाणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षेला गंभीर धोका निर्माण झाला आहे.

रामकृष्ण विद्यालयासमोरील बस थांब्यालगत रोज १० ते १२ ऑटो उभे राहत असून, बस थांबते की नाही हेच नागरिकांना समजत नाही. प्रवासी निवाऱ्यासमोर बिनधास्त उभे राहणारे हे ऑटो चालक कोणत्याही प्रकारचा नियम पाळत नसल्याने, कोणत्याही क्षणी अपघात होण्याची शक्यता ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

या मार्गावरून मोठ्या प्रमाणात जड वाहने ये-जा करतात. विद्यार्थी आणि रुग्ण यांच्यासाठी ही परिस्थिती अधिकच धोकादायक आहे. बसच थांबण्याची जागा झाकून टाकल्याने अनेक प्रवाशांना बस चुकते आहे, तर काहींना रस्त्यावरच उभे राहावे लागत आहे. ग्रामपंचायत सदस्य राजकुमार गौतम यांनी या विषयावर तीव्र संताप व्यक्त केला असून, पोलीस प्रशासन आणि परिवहन विभागाकडे कठोर कारवाईची मागणी केली आहे.

“ ऑटोचालक बस थांब्यावर अतिक्रमण करून प्रवाशांना त्रास देत आहेत. त्यांच्या उद्धट वर्तनामुळे महिला व वृद्ध प्रवासीही अस्वस्थ आहेत. काही ऑटोचालक तर खुलेआम पोलिस आमच्या खिशात आहेत, असे सांगतात.” – राजकुमार गौतम, ग्रामपंचायत सदस्य

गौतम पुढे म्हणाले की, "प्रवासी निवाऱ्याच्या जागेचा दिवसभर अतिक्रमणासाठी गैरवापर होतो आहे. प्रशासनाने त्वरित लक्ष न दिल्यास ग्रामस्थ रस्त्यावर उतरून संपूर्ण मार्ग बंद करतील व तीव्र आंदोलन छेडतील."

कुऱ्हाडी गावकरी व प्रवासी वर्ग प्रशासनाकडे आशेने पाहत आहेत की, अखेर पोलीस आणि परिवहन विभाग या गंभीर समस्येकडे लक्ष देऊन कारवाई करतील का? की एखादी जीवितहानी झाल्यानंतरच त्यांना जाग येईल?

# गोरेगाव मध्ये "एक पेड माँ के नाम" उपक्रमांतर्गत वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

--------------------



"एक पेड माँ के नाम" या अनोख्या उपक्रमांतर्गत पी. डी. राहांगडाले विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, गोरेगाव येथे वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या मातेसम प्रेम व्यक्त करत तिच्या नावाने एक झाड लावले. यामध्ये पर्यावरण संरक्षणाबरोबरच मातृप्रेमाची जाणीवदेखील जपण्यात आली. कार्यक्रमाचे उद्घाटन विद्यालयाचे प्राचार्य सी. डी. मोरघडे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. प्रमुख उपस्थितीत पर्यवेक्षक ए. एच. कटरे यांनी विद्यार्थ्यांना दरवर्षी एक झाड लावण्याचे आणि त्याचे संगोपन करण्याचे आवाहन केले. त्यांनी वृक्षांचे पर्यावरणीय व सामाजिक महत्त्व विशद करत विद्यार्थ्यांमध्ये वृक्षारोपणाची जाणीव निर्माण केली. या कार्यक्रमात शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे नियोजन व संयोजन सौ. ए. एस. बावनथडे यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी वृक्षसंवर्धन आणि झाडांच्या संगोपनाची जबाबदारी घेण्याचा संकल्प केला.

# "नाफेडची कांदा खरेदी म्हणजे भ्रष्टाचाराला निमंत्रण" नाफेडची कांदा खरेदी नको ग बाई.! कुबेर जाधव

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------






व्यंगचित्रकार किरण मोरे..

नाफेड' आणि 'एनसीसीएफ' यांच्या भ्रष्टाचारामुळे वैतागलेल्या केंद्रीय कृषिमंत्र्यांनी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायट्यांना नाफेड कांदा खरेदीसाठी परवानग्या दिल्या खर्या परंतु त्यासाठी खुपच किचकट नियमावली आणि निकष ठरविण्यात आले, त्यामुळे जिल्ह्यातील बहुतांश सोसायट्यांनी कांदा खरेदी कडे पाठ फिरवली,. गेल्या पाच वर्षांत अनेक अग्रो प्रोडुसर कंपन्यांनी अधिकाऱ्यांशी संगनमत करून कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार केला, व्यक्ती त्याच पण नांवे बदलून त्यांनीच मोठ्या प्रमाणात आताही कांदा खरेदी करून ठेवलेला आहे. फक्त खाजगी गोदामात,

प्रत्यक्षात आधीच स्वस्तात खरेदी केलेला कांदा व्यापारी व अग्रोप्रोडुसरवाले 'नाफेड'चा कांदा म्हणून दाखवला जाईल. त्यातून पुन्हा शेकडो कोटींचा भ्रष्टाचार होईल. पारदर्शक कांदा खरेदी करून घेणे ही केंद्र सरकार बरोबर राज्य सरकारचीही जबाबदारी आहे. कांदा हा बाजार समित्यांमधून थेट लिलावातून खरेदी करावा. तरच शेतकऱ्यांकडून खरेदी झाली असे म्हणता येईल,

शिवार खरेदीमध्ये अनेक प्रकारचे गैरव्यवहार समोर आले आहेत. ही कांदा खरेदी ही बाजार समितीच्या आवारातच व्हावी.या बाबत केंद्रीय कृषिमंत्री व 'नाफेड'च्या अध्यक्षांना ही निवेदनाद्वारे अवगत करण्यात आले आहे.नाफेड आणि एनसिसिएफ ला शेतकऱ्यांशी काही एक घेणे नाही, त्याना शहरी ग्राहकांना भविष्यात स्वस्तात कांदा उपलब्ध व्हावा, म्हणून बाजार हस्तक्षेप करून लाखोंटन कांदा खरेदी करून बफर स्टाक करून ठेवायचा आहे, कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या मागणीनुसार नाफेड आणि एनसिसिएफ ने थेट बाजारात उतरुन कांदा खरेदी केला पाहिजे,

मात्र याकडे दुर्लक्ष केले जात आहे. मागील वर्षासारखाच पडद्याआड खरेदी सुरू केली जात आहे, कुठे खरेदी सुरू आहे याचा थांगपत्ताही लागत नाही, नावालाच पारदर्शकता असल्याचे भासवून बिनबोभाटपणे लुटलं जात आहे, गेल्या वर्षी दिलेलं टार्गेट पूर्ण करण्यासाठी सर्रासपणे उन्नाळ कांद्या ऐवजी लाल तोही सडका कांदा पुरवला होता, हे पुराव्यानिशी सिद्ध होऊनही काहीही कार्यवाही अद्यापपर्यंत झाली नाही, खुल्या बाजारात खरेदी न करता परस्पर खरेदी केलेला कांदा साठवणूक करून पुन्हा भ्रष्टाचाराला रान मोकळे करू नये. कुबेर जाधव समन्वयक स्वाभिमानी शेतकरी संघटना नाशिक

# धुळे येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष खा. श्री. सुनील तटकरे यांच्या नेतृत्वात आढावा बैठक संपन्न

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------



धुळे येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, धुळे जिल्ह्याची आढावा बैठक प्रदेशाध्यक्ष मा. खा.श्री सुनील तटकरे यांच्या नेतृत्वात पार पडली. या बैठकीत कार्यकर्त्यांशी पक्षाच्या संघटनात्मक बांधणीसाठी सखोल चर्चा करण्यात आली.

धुळे जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अधिक सक्षम व प्रभावीपणे उभी राहावी यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी एकत्र येत संघटनेच्या मजबुतीसाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन या वेळी मा. सुनील तटकरे यांनी केले.

या बैठकीसाठी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा तथा महिला प्रदेशाध्यक्षा मा. सौ. रूपालीताई चाकणकर, माजी मंत्री, मा.आ. श्री. अनिल पाटील, मुख्य प्रवक्ते मा. श्री. आनंद परांजपे, युवक प्रदेशाध्यक्ष मा. श्री सूरज चव्हाण, माजी आमदार मा. श्री डी. एस. अहिरे, माजी आमदार मा. श्री शरद पाटील, प्रदेश सरचिटणीस मा. श्री लतिफ तांबोळी, ओबीसी प्रदेशाध्यक्ष मा. श्री कल्याण आखाडे, विद्यार्थी प्रदेशाध्यक्ष मा. श्री प्रशांत कदम, सामाजिक न्याय विभागाचे राज्यप्रमुख मा. श्री सुनील मगरे, राष्ट्रवादी मोटर मालक कामगार वाहतुक सेलचे राज्यप्रमुख मा. श्री सचिन जाधव, युवती प्रदेशाध्यक्ष मा.कु. संध्या सोनवणे, धुळे जिल्हाध्यक्ष मा. श्री.सुरेश सोनवणे, धुळे जिल्हा युवाउपाध्यक्ष श्री.मनीष देसले, साक्री तालुका अध्यक्ष श्री. विलास दादा देसले, साक्री तालुका सरचिटणीस श्री.किशोर अहिरराव, विधानसभा क्षेत्र प्रमुख तालुका साक्री श्री.राज देवरे यांच्यासह प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist-Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

# डॉ. शालिनीताई बोरसे माध्यमिक विद्यालयात शिक्षक पालक संघाची स्थापना

संतोष मोहिते
विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------







नाशिक शहरातील सिडको परिसरात असलेली नामांकित शैक्षणिक संस्था अंबिका मित्र मंडळ संचलित डॉ. शालिनीताई बोरसे माध्यमिक विद्यालयात शनिवार दिनांक ०५/०७/२०२५ रोजी विद्यालयात महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाच्या अधिसूचनेनुसार प्रत्येक विद्यालयात दरवर्षी शिक्षक - पालक संघाची स्थापना करणे अनिवार्य असते त्या अनुषंगाने शिक्षक - पालक संघाची स्थापना करण्यात आली. याप्रसंगी विद्यालयात मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते. याप्रसंगी पालक-शिक्षक संघाच्या कार्यकारिणीची स्थापना करण्यात आली. सर्वानुमते समितीचे सदस्य पालकांमधून निवडण्यात आले. तसेच शाळा व्यवस्थापन समिती व विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा विकसन समिती यातील सदस्य ही पालकांमधून निवडण्यात आले . पालक-शिक्षक संघाच्या माजी उपाध्यक्षा सौ. वानखेडे ताई यांनी सर्व कार्यकारिणीला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष माननीय श्री. बाळासाहेब पाटील, सचिव संदिप पाटील, संस्थेचे प्रशासन अधिकारी श्री.राजेंद्र सोनवणे, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. देवकर कविता मॅडम उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिवे प्रतिभा मॅडम यांनी केले. कार्यक्रमास मोरे कुमुद , देसले एल. पी . मनीषा पाटील , ज्योती गुजर, चांदनी पगारे, प्रीती अस्वार, लोखंडे मॅडम , सुनील पाटील, भाऊसाहेब भामरे यांनी मोलाचे सहकार्य केले.

# प्रा. प्रणेता देसले यांचे ७व्या पुस्तकाचे महिला आयोग अध्यक्ष्या रुपाली चाकणकर यांच्या हस्ते प्रकाशन

## प्रणेता देसले यांचे फार्मसी क्षेत्रातील कार्य कौतुकास्पद - रुपाली चाकणकर

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------



शनेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ संचलीत कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य प्रणेता देसले लिखित बी. फार्मसीच्या सहाव्या सेमिस्टर साठी लागणाऱ्या फार्मासुटिकल बायोटेक्नॉलॉजी या पुस्तकाचे महिला सहाव्या आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. विशेषता ग्रामीण भागात शिक्षण पूर्ण करून प्राध्यापक प्रणेता देसले यांनी आपली शिक्षण क्षेत्रात स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. अमेरिकेच्या जरनल ऑफ फार्मास्युटिकल रिसर्च व जरनल ऑफ प्रोटिओमिक्स या दोन नामांकित जरनल्सच्या एडिटोरिअल बोर्ड मध्ये प्रणेता देसले यांचा समावेश करण्यात आला आहे. प्राध्यापक प्रणेता देसले हे गेल्या अठरा वर्षांपासून फार्मसी फिल्ड मध्ये योगदान देत आहेत. तसेच त्यांनी करोनाकाळातील पहिल्या लॉकडाऊनमध्ये देशातील विविध विद्यापीठ तसेच विविध संस्था विविध संघटना यांच्या मार्फत ऑनलाईन पध्दतीने आयोजित केलेल्या कॉन्फरंसेस, सेमिनार, वेबीनार, ई-समिट, लिडरशिफ टॉक, वर्कशॉप, पॅनल डिस्क्शन, करोनावर आधारीत प्रश्नमंजुशा इत्यादी पाचशे हुन अधिक कार्यक्रमांमध्ये सहभाग नोंदविल्यामुळे वर्ल्ड ग्रेटेस्ट रेकॉर्ड मध्ये त्यांच्या नावाची नोंद झालेली आहे. प्राचार्य प्रणेता देसले यांनी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांच्या तर्फे देण्यात येणाऱ्या विविध जबाबदाऱ्या देखील आजपर्यंत यशस्वीरित्या पार पाडलेल्या आहेत. परिक्षा प्रमुख, विविध डिप्लोमा फार्मसी कॉलेजचे मुल्यांकन समिती अध्यक्ष पदाची जाबबदारी देखील पार पाडलेली आहे. तसेच महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळातर्फे एम.एस.सी.आय.टी. या कॉम्प्युटर कोर्सच्या परीक्षेसाठी त्यांची व्हिजीलन्स स्कॉड म्हणून देखील जबाबदारी पार पाडलेली आहे. महाराष्ट्र तंत्रशिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या डिप्लोमा फार्मसीच्या परिक्षांसाठी व्हिजीलंन्स स्कॉड म्हणून देखील जबाबदारी पार पाडलेली आहे. डिप्लोमा फार्मसीच्या परिक्षांसाठी काम करणाऱ्या डिस्ट्रिब्युशन सेंटरच्या व्हिजीलंन्स स्कॉड म्हणून देखील जबाबदारी पार पाडलेली आहे. डिप्लोमा फार्मसीच्या परिक्षांसाठी काम करणाऱ्या गुणमूल्यांकन केंद्राच्या व्हिजीलंन्स स्कॉड म्हणून देखील जबाबदारी पार पाडलेली आहे तसेच बी. फार्मसीच्या परीक्षांसाठी देखील व्हिजिलन्स स्कॉड म्हणून देखील जबाबदारी पार पाडलेली आहे. प्रणेता देसले यांचे विविध राष्ट्रीय व अंतर राष्ट्रीय जर्नल्स मध्ये आर्टीकल्स देखील प्रकाशीत झालेले आहेत. प्रणेता देसले यांना नवी दिल्लीच्या इंटरनॅशनल इंस्टीट्युट ऑफ एज्युकेशन ॲण्ड मॅनेजमेंट यांच्या तर्फे राष्ट्रीय विद्या सरस्वती पुरस्कार देऊन गौरविण्यात आलेले आहे तसेच प्रणेता देसले यांची विविध राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय जर्नल्सच्या संपादकीय मंडळात देखील कार्यरत आहेत. तसेच प्रणेता देसले यांच्या शिक्षण क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन चेन्नईच्या इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग रिसर्च या संस्थेने त्यांची प्रोफेशनल आंबेसेडर पदी नियुक्ती केलेली आहे. प्रणेता देसले यांचे आतापर्यंत अकरा पेटेन्ट प्रकाशित झालेले आहेत. सन्माननीय रुपाली चाकणकर यांनी प्रणेता देसले यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील कार्याचे कौतुक केले व प्रणेता देसले हे शिक्षण क्षेत्रातील आदर्श व्यक्तिमत्व आहे व प्रणेता देसले यांचे फार्मसी क्षेत्रातील कार्य कौतुकास्पद आहे असे उदगार काढले. प्रणेता देसलेंच्या पुस्तक प्रकाशित झाल्याबद्दल त्यांना शैक्षणिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवर शुभेच्छा देत आहेत.

# प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे हे बी द चेंज फाऊंडेशन शिर्डी यांच्या राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

## महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था महासंघाचे अध्यक्ष ओमप्रकाश कोयटे; हिवरे बाजार येथील प्रसन्न पोपटराव पवार यांच्या प्रमुख उपस्थिती

सुनील म्हसदे
बागलाण तालुका प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
------------------------




बी द चेंज फाऊंडेशन शिर्डी, आहील्यानगर येथे, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था महासंघाचे अध्यक्ष ओमप्रकाश कोयटे आणि हिवरे बाजार येथील प्रसन्न पोपटराव पवार यांच्या हस्ते राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा मोठ्या दिमाखात पार पडला

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे कर्मवीर गणपत दादा मोरे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय निफाड येथील उपक्रमशील प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे यांच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि निसर्ग संवर्धन विषयक उत्कृष्ट कार्याची दाखल घेत, त्यांना अहिल्यानगर शिर्डी येथील "बी द चेंज" फाऊंडेशन च्या तर्फे राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार सन्मानपूर्वक देण्यात आला. ह्या पुरस्कार वितरण समारंभासाठी मा. ओमप्रकाश दादाप्पा कोयटे (अध्यक्ष महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था महासंघ), हिवरे बाजार येथील प्रसन्न पोपटराव पवार, पुणे येथील उद्योजक श्री. कापे, फाऊंडेशनचे अध्यक्ष मयूर ढोकचौळे, उपाध्यक्ष अभिषेक तुपे, संयोजक अक्षय आव्हाड, उद्योजक अमृत रोहम आदी मान्यवर उपस्थित होते. विशेष म्हणजे राज्यभरातून एकूण १३१० नामांकने प्राप्त झाली होती, त्यापैकी फक्त ३६ जणांची निवड करण्यात आली.

डॉ. ढगे यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सभापती बाळासाहेब क्षीरसागर, सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, उपाध्यक्ष विश्वासराव मोरे, उपसभापती देवराम मोगल, चिटणीस दिलीप दळवी, संचालक शिवाजी गडाख, महिला संचालिका सौ. शोभाताई भागवत बोरस्ते, शिक्षणाधिकारी डॉ. नितीन जाधव, डॉ. उत्तमराव डेरले, सर्व प्राध्यापक वृंद आणि आप्तेष्ट नातेवाईक यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत...





महाराष्ट्राचे आराध्य दैवत यांच्याआठवणींचे प्रतीक म्हणून याही वर्षी साक्री शहरात आषाढी एकादशी निमित्ताने महाप्रसादाचे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजक चालक-मालक संघटना यांच्याकडून करण्यात आले आहे . या कार्यक्रमात सहभागी तृतीय पंथी यांनी ही उपस्थिती लावली हे दरवर्षी यांच्या हातून महाप्रसादाचे वाटप केले जात असे
(छायाचित्र विनोद मोरे साक्री शहर प्रतिनिधी )

# बाबासाहेब कवाद पतसंस्थेचे काम आदर्शवत- विकास जाधव

सचिन जाधव
पारनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
----------------------------



केंद्रीय सहकारमंत्रालया मार्फत सहकार स्थापना सप्ताहानिमित्त महाराष्ट्र राज्याच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या "एक पेड माँ के नाम" या उपक्रमा निमित्त सहाय्यक निबधंक सहकारी संस्था पारनेर व
बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमानाने न्यु इंग्लिश मेडीअम स्कुल पठारवाडी येथे १०० झाडाचे वृक्षारोपन पारनेर तालुका सहकारी संस्थेचे सहाय्यक निबंधक विकास जाधव , बाबासाहेब कवाद पतसंस्थेचे चेअरमन वसंत कवाद , पारनेर तालुका पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष शिवाजी आप्पा मोरे यांचे हस्ते करण्यात आले .

यावेळी जाधव साहेबांनी केंद्रींय सहकार मंत्रालया मार्फत हे वर्षे आंतरराष्ट्रीय सहकार वर्षे साजरे करत असल्याने भारत सरकार व महाराष्ट्र राज्याच्या वतीने सहकार क्षेत्रात वेगवेगळे उपक्रम राबवित असून सहकाराचे महत्त्व वाढविणे ही काळाची गरज असल्याने सहकाराविषयीचे अनेक कार्यक्रम होत आहे .तसेच बाबासाहेब कवाद पतसंस्था नेहमी आर्थिक , सामाजिक , शैक्षणिक,कार्यात नेहमी प्राधान्याने सहभागी होऊन आदर्श असे कामकाज करीत आहे.

यावेळी संस्थेचे चेअरमन वसंत कवाद यांनी संस्थेच्या आर्थिक स्थितीची तसेच सामाजिक उपक्रमाची माहीती दिली .

यावेळी पारनेर तालुका पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष शिवाजी आप्पा मोरे, सहकार अधिकारी श्रेणी १चे राजेंद्र बी.वाघमोडे,प्रमाणित लेखा परिक्षक सतीष मुळे, संस्थेचे व्हा चेअरमन नामदेव थोरात, संचालक बाळासाहेब लामखडे, दामुशेठ लंके, भिवाशेठ रसाळ, बाबाजी कळसकर, सतीश साळवे, मुख्यकार्यकारी अधिकारी दत्तात्रय लंके, निघोज सोसायटीचे चेअरमन सुनिल वराळ, व्हा.चेअरमन संतोष लामखडे, संचालक दिलीप कवाद, संपदा पतसंस्थेचे चेअरमन शिवाजी वराळ, प्राचार्य डायस सर, नागेश पतके, रामदास भोसले, रायचंद गुंड, संदीप रसाळ, हरिभाऊ चौधरी, नारायण मोरे, शब्बीर इनामदार, निवृत्ती अडसरे, रावसाहेब वाढवणे, संगिता कवाद, मोनिका डायस इत्यादी मान्यवर व निघोज परिसरातील पतसंस्थाचे पदाधिकारी अधिकारी यावेळी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अनिल नऱ्हे सर यांनी केले तर आभार दत्तात्रय लंके यांनी मानले

# डॉ. डी. एस. आहेर प्राथमिक विद्यालयात आषाढी एकादशी भक्तिभावाने साजरी

## पालखी पूजन, टाळनृत्य, वृक्षारोपण आणि विठ्ठल-रुक्मिणी वेशभूषेत विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

संतोष मोहिते
विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत
------------------------





अंबिका मित्र मंडळ संचलित डॉ. डी. एस. आहेर प्राथमिक विद्यालय, दौलतनगर, सिडको, नाशिक येथे दिनांक ०५ जुलै २०२५, शनिवार रोजी आषाढी एकादशी मोठ्या भक्तिभावात साजरी करण्यात आली.या दिवशी विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रुक्मिणीची वेशभूषा करून शाळेचे वातावरण संपूर्णपणे भक्तिमय झाले. कार्यक्रमास वारकरी संप्रदायाचे पाईक ह.भ.प. श्री अण्णासाहेब आहेर आणि ह.भ.प. श्री साहेबराव बापू मंडळ पाडळदेकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते पालखीचे पूजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी टाळ-मृदुंगाच्या गजरात टाळनृत्य सादर केले. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे आणि संस्थेचे सचिव श्री संदीप पाटील यांच्या हस्ते पालखी मिरवणूक व वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष श्री बाळासाहेब पाटील, प्रशासन अधिकारी श्री राजेंद्र सोनवणे, मुख्याध्यापिका श्रीमती विद्या पाटील मॅडम,व इतर मान्यवर उपस्थित होते. टाळ-मृदुंगाच्या गजरात सर्व मान्यवरांनी रिंगणात सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सौ. भाग्यश्री पवार मॅडम यांनी तर नियोजनात सौ. वैशाली भामरे, श्री संदीप आहिरे, सौ. सविता वाघ, सौ. वर्षा पालवे, श्री पंकज सोनवणे, सौ. पूनम पाटील, शहा सर, सौ. माधवी पाटील, सौ. अश्विनी गायकवाड, श्री संदीप दांडगे सर, सौ. धनश्री विसपुते, सौ. वृषाली महाजन यांचे मोलाचे सहकार्य लाभले. शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी देखील विशेष मेहनत घेतली.

हा भक्तिपूर्ण कार्यक्रम विद्यार्थ्यांमध्ये सांस्कृतिक व धार्मिक मूल्यांची जाणीव निर्माण करणारा ठरला.

# "सहीपासून पुन्हा अंगठ्याकडे: टेक्नोलॉजीचा विसंगत प्रवास!"

" शिक्षण माणसाला अंगठा देण्यापासून सहीकडे घेऊन गेलं. पण टेक्नोलॉजीने पुन्हा सहीपासून अंगठ्याकडे नेलं."

या एका वाक्यात आजच्या यंत्रयुगातील एक तिरकस आणि बोचरी वस्तुस्थिती लपलेली आहे.

साक्षरतेचा आत्मसन्मान आणि सहीचा अभिमान भारतीय समाजात शिक्षणाचा मूलभूत उद्देश साक्षरतेकडे नेणं, आणि त्यातून माणसाच्या आत्मसन्मानाला ओळख देणं हाच राहिला आहे. एखाद्याने फॉर्मवर सही केली की, तो फक्त स्वतःचं नावच नाही, तर स्वतःच्या अस्तित्वावर शिक्कामोर्तब करतो. सही ही केवळ नावाची खूण नव्हे, तर ती एक सामाजिक स्वीकृती आणि आत्मभानाची ओळख बनली होती. " सही करणारा" म्हणजे विचार करणारा, निर्णय घेणारा, आणि जबाबदारी स्वीकारणारा नागरिक.

डिजिटल सोयीमुळे परतीचा प्रवास? पण आजच्या डिजिटल युगात, बायोमेट्रिक ओळख ही सर्वात प्रमाणिक ओळख ठरत आहे. अंगठा ठसा म्हणजे ओळख. सही म्हणजे — पुरेशी नाही. आधार कार्ड, बँक व्यवहार, रेशन दुकान, मोबाईल अनलॉक — या सर्व ठिकाणी अंगठ्यानेच ओळख पटते. आणि जर बायोमेट्रिक स्कॅन फेल झाला, तर व्यक्ती 'अमान्य' ठरते – मग ती कितीही शिक्षित, जबाबदार किंवा सन्माननीय असो.

प्रश्न – प्रगती की विसर?

हा तांत्रिक सोयीचा भाग आहे, नक्कीच. पण तो एक विचारविनिमयाची गरज निर्माण करणारा विसर सुद्धा आहे.

"शिक्षणाने दिलेली सही जर आज उपयोगात येत नसेल, तर आपण साक्षरतेवरचा विश्वास हरवत आहोत का?"

टेक्नोलॉजी माणसासाठी — की माणूस यंत्रासाठी? तंत्रज्ञानाचं उद्दिष्ट माणसाला सक्षम करणं असावं. त्याच्या विचारक्षमतेला, अभिव्यक्तीला चालना देणं असावं. पण जर ते माणसाला 'फक्त अंगठा लावणारा युजर' बनवत असेल, तर शिक्षणाचा खरा उद्देश अधुराच राहतो.

तुमचं नाव, तुमची सही, तुमचं शिक्षण – सगळं गळून पडतं, कारण मशीनला फक्त अंगठा हवा असतो. प्रगती की पुनरागमन? – काही उदाहरणं

१. आधार बायोमेट्रिक व्हेरिफिकेशन:
माणसाचं संपूर्ण डिजिटल अस्तित्व एका अंगठ्यावर अवलंबून.
सही नाही, कागद नाही, फक्त स्कॅन.

२. मोबाईल/फेस अनलॉक:
पासवर्ड लिहायचा काळ संपला. आता चेहरा दाखवा, अंगठा ठेवा, काम झालं!
सोयी झाली, पण विचार, वाचन, लक्ष, साक्षरता... कुठे हरवली?

शिक्षणाने दिलेला प्रकाश पुन्हा सावलीत जातोय का?

शिक्षण म्हणजे अंधारातून प्रकाशाकडे वाटचाल.

सही करणं म्हणजे स्वतःचा आत्मसन्मान जपणं.

म्हणूनच आज टेक्नोलॉजीने दिलेल्या सुविधा उपयोगी असूनही, त्या वैयक्तिक ओळख, साक्षरता, आणि मानवी सहभाग यावर गदा आणत असतील, तर त्या प्रगतीच्या गोंडस नावाखाली घडणाऱ्या पुनरागमनाचे संकेत आहेत.

निष्कर्ष:

"तंत्रज्ञान माणसासाठी हवं – त्याच्या विचार, मत, आणि ओळख जपणारं हवं.

जर यंत्रणांनी व्यक्तिमत्त्वाला अंगठ्यात मर्यादित केलं, तर ती सोय न राहता विसर ठरेल."

एक शेवटचा विचार...

शिक्षणाने माणसाला अंगठ्यापासून सहीकडे नेलं. आता तंत्रज्ञान पुन्हा त्याला अंगठ्यापाशी परत नेतंय. "अंगठा यंत्र वाचतं – पण सही इतिहास लिहते." म्हणून अंगठा वापरणं चुकीचं नाही, पण सही विसरणं धोकादायक आहे.



**लेखक:**

------------------------------------

**प्रविण काकुस्ते**

**(स्वतंत्र लेखक, सामाजिक निरीक्षक )**

# "एक झाड आईच्या नावे" उपक्रमांतर्गत मुंडीपारमध्ये वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न

देवेन्द्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधि
दैनिक स्वराज्यदूत

--------------------------------









पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण असलेला "एक झाड आईच्या नावे" हा उपक्रम गोंदिया तालुक्यातील ग्रामपंचायत मुंडीपार येथे दिनांक ६ जुलै २०२५ रोजी मोठ्या उत्साहात पार पडला. या उपक्रमांतर्गत संपूर्ण गावात विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले.

कार्यक्रमाचे आयोजन ग्रामपंचायत मुंडीपारच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी सरपंच सौ. भुमेश्वरी देबिलाल सुलाखे यांनी पर्यावरण रक्षणाचे महत्त्व पटवून देताना सांगितले, " झाडांची संख्या दिवसेंदिवस कमी होत असून, याचा थेट परिणाम पाण्याच्या पातळीवर, प्रदूषणाच्या वाढीवर आणि ऑक्सिजनच्या घटत्या पातळीवर दिसून येत आहे. त्यामुळे निसर्गाचे रक्षण करणे ही आजची गरज बनली आहे."

कोरोना महामारीच्या काळातील अनुभव शेअर करत सरपंच सुलाखे म्हणाल्या, "त्या कठीण काळात ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे अनेकांचे प्राण गेले. त्यामुळे झाडांचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले. निसर्गाशी खेळल्यास तो आपल्याशीही खेळतो, हे आपण अनुभवले आहे."

सरपंचांनी पुढे सांगितले की, "झाड म्हणजे जीवन. प्रत्येकाने आपल्या जीवनातील एखाद्या महत्त्वाच्या प्रसंगी – जसे की नवजात बाळ जन्मल्यावर – एक झाड लावावे, आणि त्या झाडाची जपणूक आपल्या मुलाप्रमाणे करावी. यामुळे आपण निसर्गाशी नाते अधिक घट्ट करू शकतो."

कार्यक्रमात विविध मान्यवर, अधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांमध्ये सरपंच सौ. भुमेश्वरी देबिलाल सुलाखे , उपसरपंच श्री. संजय मेंढे ,ग्रामविकास अधिकारी श्री. रामेश्वर चौधरी ,सामाजिक कार्यकर्ते श्री. देबिलाल सुलाखे, श्री. बाबूलाल कावळे, श्री. गुलाब पटले ,शिक्षण क्षेत्रातील प्रतिनिधी श्री. राजू दीक्षित सर, मुख्याध्यापक श्री. दमाहे सर ,वैद्यकीय अधिकारी डॉ. राजू पटले, श्री. अमर खोब्रागडे , वनरक्षक सत्वन सर , पोलिस पाटील श्री. आनंद सावंतकर ,रोजगार सेवक श्री. रामेश्वर चौधरी यांच्यासह गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या उपक्रमामुळे गावकऱ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण झाली असून, " एक झाड आईच्या नावे" ही संकल्पना पुढे नेण्यासाठी ग्रामस्थ कटिबद्ध असल्याचे चित्र या कार्यक्रमातून दिसून आले.

# वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या वाहनधारकावर धडक कारवाई

## १३ दुचाकी धारकांकडून दंडापोटी ८५०० रूपये वसूल

मनोज बिरादार
नांदेड जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

------------------------------------



देगलूर शहरात वाहन चालविण्याचा परवाना नसलेल्या, ट्रिपल सीट बसून दुचाकी चालविणाऱ्या, दुचाकीला नंबर प्लेट नसलेल्या, आरसी बुक नसलेल्या व वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या दुचाकी धारकांविरुद्ध देगलूर पोलिसांनी धडक मोहीम सुरू केली असून १३ दुचाकी धारकांकडून दंडापोटी ८५०० रूपये वसूल केले.

गेल्या कांही महिन्यांपासून देगलूर शहरातील शाळा, महाविद्यालये, शिकवणी वर्ग परिसरात अल्पवयीन सडक सख्याहरींचे टोळके दुचाकीवर डबल सीट, ट्रिपल सीट बसून धुडगूस घालत आहे. एवढेच नव्हे तर शहरातील अनेक दुचाकीधारक नंबर प्लेट नसलेली दुचाकी चालवत आहेत. वाहन चालवण्याचा परवाना नसलेले अनेक युवक तसेच प्रौढ नागरिक बिनधास्तपणे दुचाकी घेऊन शहरात फिरत आहेत. अनेक जण आरसीबुक सोबत न ठेवता दुचाकी घेऊन फिरत आहेत. त्यामुळेजनता त्रस्त झाली आहे. ही बाब गांभीर्याने घेऊन देगलूर पोलीस ठाण्याच्या वतीने सपोनि अश्रूदेव पवार, पोलीस उपनिरीक्षक गोपाळ इंद्राळे व ट्रॅफिकचे पोलीस जमादार माधव मरगेवार यांच्या नेतृत्वाखाली कांही पोलीस कर्मचारी व तब्बल २५ होमगार्डचे दोन पथक तयार करण्यात आले. यातील एक पथक लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकात तर दुसरे पथक पाण्याच्या टाकीजवळ नवीन सराफा मार्केटच्या कोपऱ्यावर कार्यरत होते. या पथकातील कर्मचाऱ्यांनी या ठिकाणाहून जाणाऱ्या दुचाकी धारकांकडे आरसीबुक, ड्रायव्हिंग लायसनची मागणी केली. ट्रिपल सीट जाणाऱ्या दुचाकी धारकांना थांबवून त्यांची चौकशी केली. नवीन नंबर प्लेट नसलेल्या वाहनधारकांचीही चौकशी करण्यात केली.

# मुख्यमंत्री फडणवीस यांच्या सोबत जातेगाव च्या वारकरी दाम्पत्याला मिळाला महापूजेचा मान

सोमनाथ घोगांणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------





आषाढी एकादशीच्या निमित्ताने श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या आज पहाटे २.३० वाजता देशातील सर्व वारकरी बांधवांच्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस व सौ अमृता फडणवीस यांच्या हस्ते केल्या जाणाऱ्या महा पूजेसाठी वारकरी संप्रदायातील मानाचा असणारा बहुमान नाशिक जिल्ह्यातील नांदगाव तालुक्यातील जातेगाव येथील वारकरी श्री. कैलास दामु उगले यांना मिळाला.

सविस्तर वृत्त असे की, नांदगाव तालुक्यातील जातेगाव येथील श्री कैलास उगले हे एक सर्वसामान्य शेतकरी असून ते गेल्या १२ वर्षांपासून सपत्नीक पंढरपूरची नियमित वारी करत आहेत. यावेळी आषाढी एकादशीच्या पवित्र दिवशी २० लाखांपेक्षा अधिक भाविक विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूर नगरीत दाखल झालेले असताना, नाशिक जिल्ह्यातील नांदगाव तालुक्यातील जातेगाव येथील कैलास दामू उगले यांना यंदाच्या शासकीय महापूजेचा मान लाभला आहे. हे एक अत्यंत गौरवाचे आणि आध्यात्मिक महत्त्व असलेले क्षण आहे. कारण या पूजेमध्ये थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत सहभागी होण्याची संधी उगले कुटुंबाला मिळाली आहे. याप्रसंगी त्यांचा मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

शेतकरी असूनही वारकरी परंपरेला वाहून घेतलेल्या उगले दांपत्याने संपूर्ण महाराष्ट्रासाठी एक प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले आहे. ग्रामीण भागातील साधे जीवन जगत असतानाही, त्यांच्या निष्ठेने त्यांना विठुरायाच्या सान्निध्यात राज्यस्तरीय सन्मान उपलब्ध करून दिल्याने ही समाजासाठी प्रेरणादायी घटना आहे कैलास उगले हे नाशिक जिल्ह्यातील प्रथम वारकरी ठरले आहेत

### पांडुरंगा वरील १२ वर्षाच्या निष्ठेचे फळ मिळाले - डॉ अमोल उगले

### शेतकरी असूनही वारकरी परंपरेचा अभिमान

आमचे काका श्री कैलास दामु उगले आणि काकू सौ कल्पना उगले हे एक सर्वसामान्य शेतकरी असून गेल्या १२ वर्षांपासून पंढरपूरची नियमित वारी करत आहेत. त्यांची वारकरी संप्रदायाशी असलेली निष्ठा आणि भक्तिभाव यामुळे पांडुरंगानेच त्यांना वारकऱ्यां मध्ये मानाचे स्थान प्राप्त केले आहे. या श्रद्धेच्या आणि सेवाभावाच्या आधारेच यावर्षी त्यांची मानाच्या वारकऱ्यांमध्ये निवड करण्यात आली आहे. असे मत त्यांचे पुतणे डॉ अमोल उगले यांनी व्यक्त केले.

# न्यू इंग्लिश स्कूलमध्ये भरली विठू नामाची शाळा

सोमनाथ घोगांणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------




मविप्र संचलित न्यू इंग्लिश स्कूल नांदगाव विद्यालयात दिंडी व रिंगण सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुणाल भाऊ खरोटे होते. व्यासपीठावर विजय काकळीज सर ,गवांदे काका ,अशोक भाऊ शिंदे, राजेश आबा पाटील ,संजीव निकम, बरोडे साहेब, संदीप जेजुरकर, बाबासाहेब कदम ,श्रीमती मनीषा ताई काकळीज ,श्रीमती अक्षदा ताई कुलकर्णी ,मुख्याध्यापिका सौ ज्योती काळे , पर्यवेक्षक श्री अविनाश शेवाळे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात विठुरायाच्या प्रतिमा पूजन व अश्वपूजनाने मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर विठुरायाची आरती देखील घेण्यात आली.

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे दिंडी व रिंगण सोहळा यात विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल ,ज्ञानोबा माऊली तुकाराम चा जय घोषणा भव्य दिंडी व रिंगण सोहळा मोठ्या प्रमाणात उत्साहात साजरा करण्यात आला .याप्रसंगी विद्यार्थ्यांनी वारकरी वेशभूषा सादर करत टाळ व मृदुंगाचा तालावर पावली घेतली. अश्व रिंगण देखील घेण्यात आले. भागवत धर्माचा ध्वज पताका फडकवण्यात आली.नंदू महाराज यांच्या वारकरी आश्रमातील विद्यार्थ्यांनी देखील अभंग गायन केले. विद्यालयातील बाल कीर्तनकार शाहू पवार यांनी याप्रसंगी अभंग रुपी कीर्तन सादर केले .संपूर्ण विद्यालयात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

विद्यालयातील सर्व विद्यार्थीनी, उपस्थित मान्यवर, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी पालखी रिंगण सोहळ्यात फुगडी चा आनंद घेतला. या कार्यक्रमासाठी मविप्र संस्थेचे तालुका संचालक मा.श्री. अमित भाऊ बोरसे पाटील यांनी शुभेच्छा दिल्या. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# सरकारी-निम सरकारी, जि.प.कर्मचाऱ्यांचे ९ जुलै रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर निदर्शने

देवेन्द्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधि
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------------



सरकारी-निम सरकारी, जिल्हा परिषद, शिक्षक-शिक्षकेत्तर, नगरपालिका-नगरपरिषदा कर्मचारी समन्वय समितीची सभा दिनांक ६ जुलै २०२५ रोजी मध्यवर्ती संघटनेचे कार्यालय गोंदिया येथे संपन्न झाली. महाराष्ट्र शासनाचे आपल्या प्रलंबित मागण्यांबाबत उदाशिन धोरण दिसुन येत आहे. नवागत सरकार स्थापण झाल्यावर सहा महिण्याचा कालावधी लोटुन गेला मधल्या कालावधीत मा. मुख्यमंत्री पातळीवर चर्चा करुन ठोस निर्णय घेण्यात यावे यासाठी राज्य संघटनेमार्फत सातत्याने वारंवार पत्रव्यवहार करण्यात आला. परंतु संघटनात्मक प्रयत्नांना वाटाण्याच्या अक्षता लावण्यात आली. प्रलंबित मागण्याबाबत कर्मचारी वर्गात असंतोषाची भावना निर्माण झालेली आहे. शासनाचे मात्र या संदर्भात उदाशिन धोरण दिसून येत आहे.

देशातील प्रधान ११ कामगार संघटनांच्या वतीने दिनांक ०९ जुलै २०२५ रोजी देशव्यापी संप पुकारण्यात आला आहे. मार्च २०२३ मध्ये झालेल्या बेमुदत संपाच्या पार्श्वभूमिवर दिलेल्या आस्वासनाची पुर्तता अद्यापर्यन्त शासन स्तरावरुन करण्यात आली नाही त्यामुळे कर्मचारी वर्गात संतापाची लाट उमलली आहे. तसेच शासनाने दिनांक ६ सप्टेंबर २०२३ रोजी शासन निर्णय काढून राज्यातील सर्व विभागातील वर्ग १ ते ४ पर्यन्त कर्मचारी कंत्राटी कामगार नऊ कंपनीकडून भरण्याचे आदेश काढले आहे. त्यामुळे भविष्यात सरकारी कर्मचारी राहणार नसून सर्व कंत्राटी कामगार असतील अशा शासनाच्या धोरणामुळे फारच भयानक परिस्थिती निर्माण होणार आहे त्यामुळे प्रलंबित २० मागण्या बाबत दिनांक ०९ जुलै २०२५ रोजी दुपारी १ ते ३ या दरम्यान मध्यवर्ती संघटनेचे निमंत्रक लिलाधर पाथोडे यांचे नेतृत्वात जिल्हाधिकारी व जिल्हा परिषद कार्यालयासमोर भव्य निदेर्शने करण्यात येणार आहेत. व मा. जिल्हाधिकारी व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मार्फत मा. मुख्यमंत्री यांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

समन्वय समिती सभेमध्ये मध्यवर्ती संघटनेचे अध्यक्ष चंद्रशेखर वैद्य, निमंत्रक लिलाधर पाथोडे, जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचे राज्य उपाध्यक्ष व जिल्हा अध्यक्ष पी.जी.शहारे, कमलेश बिसेन जिल्हाध्यक्ष ग्राम पंचायत अधिकारी यूनियन यांचे समवेत आशिष रामटेके, संतोष तोमर, सौरभ अग्रवाल, भगीरथ नेवारे, राकेश डोंगरे, रमेश नामपल्लीवार, तु.बा.झंजाड, विस्वनाथ कापगते, डी.एल.गुप्ता, उमेश कावरे, सुरेश आष्टिकर, नितेश बांते, जितेंद्र अदमाने, विदेश सासरे, मोहनलाल पटले, यासह जिल्हयातील विविध विभागातील मोठया संख्येने शासकिय कर्मचारी, जिल्हा परिषद कर्मचारी उपस्थित होते.

# तांदुळवाडी एम. डी. काळे इंग्लिश स्कूल मध्ये आषाढी एकादशीनिमित्त दिंडीचे आयोजन

सोमनाथ घोगांणे
नांदगाव प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------



नांदगाव तालुक्यातील तांदुळवाडी येथील एम.डी. काळे इंग्लिश मीडियम पब्लिक स्कूलमध्ये आषाढी एकादशी निमित्त शाळेपासून ते मंदिरापर्यंत पायी दिंडी काढण्यात आली . यावेळी विद्यार्थी वारकरी वेशभूषा करून गळ्यात टाळ व मुलींनी नऊवार साडी परिधान करून डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन दिंडीत सहभाग घेतला होता. मुलींचे लेझीम पथक ढोल पथक तसेच फुगडी खेळून आनंद द्विगुणीत केला. सुरुवातीला विठ्ठल रुक्मिणी च्या प्रतिमांचे पूजन चेअरमन दिनेश काळे सर प्राचार्य नेहा काळे मॅम व्हाईस प्रिन्सिपल साक्षी अहिरे मॅडम यांनी केले. सूत्रसंचालन सचिन पाटील सर यांनी आपल्या भाषणातून आषाढी एकादशीचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले. शिक्षिका वंदना टीचर, प्रभाकर आहेर सर, ज्योती सुरसे, ज्योती बोरसे, प्राजक्ता काकळीज, भाग्यश्री सूर्यवंशी, अर्चना इंगोले, कविता आयनोर, पूजा झेंडे, मेघा पवार, नूतन खैरनार, नम्रता कोळी, अश्विनी घोडेराव व कर्मचाऱ्यांनी हरिपाठ, फुगडी घेतला. विठ्ठल रुक्मिणी च्या जयघोषाने शाळा व गाव दुमदुमले होते. मंदिरात दर्शन घेऊन आरती केली. व विद्यार्थ्यांना केळी, राजगिरा लाडू हा प्रसाद वाटण्यात आला.

# महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक स्वराज्यदूत वृत्तपत्रातर्फे राज्यस्तरीय पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन !

## स्वराज्यदूत गौरव पुरस्कार

कर्तृत्वाचा सन्मान...
स्वराज्याचा मान !!



महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी, सहकार, उद्योग, वैद्यकीय, पत्रकारिता (वृत्तपत्र, इलेक्ट्रॉनिक / डिजीटल मीडिया), युवक, महिला, कला, साहित्य, क्रीडा, पर्यावरण, ग्रामविकास अशा विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनिय कार्य करणाऱ्या संस्था व मान्यवर व्यक्तींच्या कार्याचा विशेष सन्मान करून भावी वाटचालीस तसेच उल्लेखनिय कार्य करण्यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून दैनिक स्वराज्यदूतने हा पुरस्कार आयोजित केलेला आहे.

कौतुक तुमच्या कार्याचे

दैनिक स्वराज्यदूत SWARAJYADOOT
www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!

SWARAJYADOOT LIVE

दैनिक वृत्तपत्र
वृत्त वाहिनी

ऑगस्ट महिन्यात नाशिक येथे अतिशय भव्य-दिव्य समारंभात पुरस्कार वितरण नियोजित

### प्रस्ताव पाठविण्यासंदर्भात सूचना

- संपूर्ण प्रस्ताव pdf स्वरुपात संगणकावर तयार केलेल्या स्वरुपात दि. ३१ जुलै २०२५ पर्यंत फक्त Google Form द्वारेच पाठवायचा आहे. गुगल फॉर्म लिंक 8446673677 या व्हॉटसअप वर उपलब्ध केली आहे. उपलब्ध झाली नसेल तर तशी मागणी करू शकतात.
- फक्त निवड झालेल्या व्यक्तींना प्रस्तावाची प्रिंट स्वरुपात (Hard copy) जमा करावी लागेल.
- प्रस्ताव पूर्णपणे मोफत स्वीकारले जातील. कोणताही आर्थिक मोबदला देण्याचा प्रयत्न करू नये. पुरस्कारासाठी कुणाशीही आर्थिक व्यवहार करू नये.
- दैनिक स्वराज्यदूत परिवाराशी संबंधित व्यक्ती, प्रतिनिधी यांना प्रस्ताव पाठवता येणार नाहीत.
- जिल्हा परिषद कर्मचारी, राज्य व केंद्र सरकारचे कर्मचारी यांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार नाही.

अधिक माहितीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.

**8446673677 / 8010232449**